# एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई

(महिला व बाल विकास विभाग)

कार्यालयाचे पत्ता :- रायगड भवन, रिअर विंग, पहिला मजला, सी.बी.डी.बेलापूर – 400614

Email comicdsraigadbhavan@gmail.com व icdshnd2@gmail.com ☎ 022-27576388,322,323 Fax-022-27576324


क्र. एबाविसेयो/का-२/आवपो/2020-21/पर्यायी व्यवस्था/1411 , नवी मुंबई दिनांक – 15 / 4 / 2020

प्रति,

1. जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबावि)
   जिल्हा परिषद ........ सर्व
2. बाल विकास प्रकल्प अधिकारी,
   नागरी प्रकल्प ........ सर्व

विषय :- स्थलांतरीत लाभार्थ्यांना THR चा लाभ देणेबाबत..

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, गावामधील / शहरातील लाभार्थी उपजिविकेसाठी बाहेरगावी / परराज्यात जात असतात. तथापि सध्या कोरोना व्हायरसची साथ असल्यामुळे जे लोक इतर राज्यात कामाधंदा निमित्त बाहेरगावी गेले होते ते लोक परत त्यांच्या स्वग्रामी परत येत आहेत,असे उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या कार्यालयास निदर्शनास आणून दिले आहे व जे लाभार्थी परत आले आहेत, त्यांना एबाविसेयो अंतर्गत पोषण आहाराचा लाभ द्यावा किंवा नाही अशी विचारणा होत आहे. त्या अनुषंगापने आपण स्थलांतरीत लाभार्थ्यांना लाभ देण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

1. जे लाभार्थी पहिले मूळ ठिकाणी राहत होते काय? परत ते बाहेरगावातून गावात / शहरात परत आलेले आहेत, ते त्या सर्वेक्षण क्षेत्रातील रहिवासी असल्याबाबत खात्री करुन घ्यावी.
2. संबंधित स्थलांतरीत लोकांचे आधारकार्ड आहेत काय याची खात्री करावी व त्यांचे आधारकार्ड क्रमांक घ्यावेत.
3. ज्या लाभार्थ्यांना THR ची आवश्यकता असल्यास लाभार्थी/ पालकांचे अर्ज घ्यावेत.
4. सदर अर्ज अंगणवाडी सेविकेच्या दप्तरी ठेवण्यात यावा व या लाभार्थ्यांची सर्वेक्षण रजिस्टरमध्ये नोंद घेण्यात यावी.
5. लाभार्थी वयोगटानुसार [लाभार्थी गट निहाय THR साठी ६ महिने ते ३ वर्षे, गरोदर - स्तनदा माता, ११ ते १४ वर्षे वयोगटातील किशोरवयीन मुली व ३ ते ६ वर्षे गरम ताजा आहार (गरम ताजा आहाराऐवजी THR स्वरुपात घरपोच आहार)] प्रकल्पनिहाय मागणी कन्झ्युमर्स फेडरेशन (email id-consumerfed@rediffmail.com) कडे मागणी नोंदविण्यात यावी.

यासंदर्भात सोबत नमुना जोडण्यात आलेला आहे, त्याची जिल्हयाची एकत्रित माहिती उप मुख्य कार्यकारी अधिकारी / नागरी प्रकल्पासाठी बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी माहिती तात्काळ या कार्यालयास पाठवावी.

१५/४/२०२०

(इंद्रा मालो भा.प्र.से.)
आयुक्त
एकात्मिक बाल विकास सेवा योजना
महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई

प्रत : मा.सचिव, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई, माहितीस्तव सविनय सादर